
# अक्षर वाङ्मय

जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२४

वर्ष : पंधरावे अंक : पहिला



संपादक


डॉ. नानासाहेब सूर्यवंशी

## आगामी आकर्षण !

## अक्षर वाड्.मय सुधीर रसाळ विशेषांक

**आदरणीय गुरुवर्य रसाळसर यांच्या नव्वदीनिमित्ताने अक्षर वाड्.मयचा ऑक्टोबर २०२३ ते मार्च २०२४ हा जोडअंक सुधीर रसाळ विशेषांक म्हणून प्रसिद्ध होत आहे**

**रसाळसरांच्या समीक्षा वैशिष्ट्यांचा शोध घेणारे मान्यवरांचे लेख आणि रसाळसरांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंना उजागर करणारे ललित लेख यांनी समृद्ध असलेला सदर विशेषांक निश्चितच संदर्भमूल्य असलेला व संग्राह्य असेल.**



आर. एन्. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. – MAHMAR-36829-2010

ISSN – 2229-4929
UGC Approved and
Peer Reviewed Journal

# अक्षर वाङ्‌मय

**वर्ष : पंधरावे    अंक : पहिला**

**जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर २०२४**

संपादक
**डॉ. नानासाहेब सूर्यवंशी**

कार्यकारी संपादक
**डॉ. शिवाजीराव देशमुख**

मार्गदर्शक
**डॉ. अरुण प्रभुणे**

संपादक मंडळ

**डॉ. विजय वारकड**    **डॉ. दीपक चिद्दरवार**
**डॉ. रत्नाकर बेडगे**    **डॉ.अंजली मस्करेन्हस**

अमेरिकेतील समन्वयक
**रमेश देशपांडे • सोनाली जांभेकर**

---

प्रकाशक : सौ. रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी, प्रतीक प्रकाशन,
'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर ४१३५१५.
मुद्रक : श्री. जे. प्रिंटर्स, प्रा.लि., १४१६, सदाशिव पेठ, पुणे–४११ ०३०
**साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता :** डॉ. नानासाहेब सूर्यवंशी
'प्रणव', रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर, ता. अहमदपूर
जि. लातूर ४१३५१५. भ्रमणध्वनी : ९४२३६५५८४१
E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com.

**वार्षिक वर्गणी :** रु. ५००/–    **द्विवार्षिक वर्गणी :** रु. ९००/–
**पंचवार्षिक वर्गणी** : रु.२०००/–    **अंकाचे मूल्य :** रु. १२५/–

---

※ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.
※ या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

R. N. I. FOR INDIA New Delhi
R. No. – **MAHMAR-36829-2010**

**ISSN – 2229-4929**
**UGC Approved and**
**Peer Reviewed Journal**

# AKSHAR WANGMAY

**Year : 15 Volume : 1**
**July-August-September 2024**

Editor-in-Chief
**Dr. Nanasaheb Suryawanshi**

Executive Editor
**Dr. Shivajirao Deshmukh**

Advisor
**Dr. Arun Prabhune**

Editorial Board

**Dr. Vijay Warkad** **Dr. Deepak Chiddarwar**
**Dr. Ratnakar Bedge** **Dr. Anjali Mascarenhas**

U.S.A. Coordinator
**Ramesh Deshpande • Sonali Jambhekar**

---

Publisher : Sou. Rekhatai Nanasaheb Suryawanshi, Pratik Prakashan, 'Pranav', Rukme Nagar, Thodga Road, Ahmedpur 413515

Printer : Shri. J. Printers Pvt.Ltd. 1416, Sadashiv Peth, Pune 411 030

**Address for sending articles and fees :** Dr. Nanasaheb Suryawanshi
'Pranav', Rukme Nagar, Thodga Road, Ahmedpur 413515
District : Latur
Mobile phone : 9423655841
E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com

**Subscription Rates Yearly :** Rs. 500/- **Five Years :** Rs. 2000/-
**Two years :** Rs. 900/- **Current Volume :** Rs. 125/-

---

* Maharashtra State Literary and Cultural Board has granted funds for the Publication of this Journal. But Maharashtra State Literary and Cultural Board has not been responsible for writers opinion in this Journal.

* The content and opinions expressed in the articles are the views of the authors and do not necessarily reflect the views and opinions of the periodical's Editorial Board, publisher or the advisor. The authors are solely responsible for the facts and accuracy of the content of the articles.

# अनुक्रम


- संपादकीय ---------------------------------------- ४
- मुखपृष्ठसंदर्भातील तक्ता ------------------------------ ६
- मुखपृष्ठ आणि मुखपृष्ठकथेचा सुवर्णमहोत्सवी अंक ! ---------- १०
- मुखपृष्ठाविषयी ------------------------------------ १६
- सतीश काळसेकरांच्या कविता ------------------------ ४७
  **प्रा. इंद्रजित भालेराव**
- भक्ती चळवळीमुळेच वारकरी संप्रदायात आध्यात्मिक लोकशाही--- ८५
  **डॉ. नानासाहेब पवार**
- संत जनाबाई यांच्या अभंगकाव्यातील सामाजिक मूल्यमापन ----- ९२
  **सौ. तृप्ती तोडकर**
- लावणीतील स्त्रियांचा शृंगारिक नृत्याविष्कार ---------- १००
  **डॉ. आबासाहेब शिंदे**
- भाषिक सृजनशीलता ------------------------------ १०४
  **रंजना ओलेकर**
- गोमंतकीय लोकगीते आणि त्यांचे वर्गीकरण -------------- ११३
  **डॉ. प्राची जोशी**
- आकाशवाणीवरील रूपक ------------------------- १२०
  **स्वाती महाळंक**
- शेतकऱ्यांच्या जीवनाशी एकरूप झालेली कविता ----------- १२८
  **डॉ. जयद्रथ जाधव**
- ना. धों. महानोर यांच्या ‘पानझड’ कविता संग्रहातील निसर्ग ---- १३५
  **सौ. स्वाती ढवाण-पाटील**
- प्रतिक्रिया ----------------------------------- १४०
  डॉ. शरद दुधाट, सखाराम बोरकर
- ‘अक्षरवाङ्मय’चे नूतन व नूतनीकरण केलेले वर्गणीदार ------- १५०
- संपादक मंडळ -------------------------------- १५२

# संपादकीय

नव्या दमात, नव्या जोमात, नव्या जोषात 'अक्षर वाङ्मय'ने १५ व्या वर्षात पदार्पण केले आहे ! जुन्या-नव्या लेखकांना घेऊन, जुन्या-नव्या सभासदांना घेऊन मोठ्या उत्साहात आम्ही १५ व्या वर्षांची वाटचाल सुरू केली आहे. संदर्भमूल्य असलेले गत १४ वर्षातले 'अक्षर वाङ्मय'चे एकाहून एक दर्जेदार अंक-विशेषांक स्मरून मन अभिमानाने भरून येते आहे. असेच संदर्भमूल्य असलेले दर्जेदार अंक-विशेषांक देण्याचा मनोमन निश्चय करीत आगामी वर्षांची वाटचाल आम्ही चालू केली आहे.

'अक्षर वाङ्मय'ने अंक प्रकाशनाची ही सुवर्णमहोत्सवी अर्ध शतकी वाटचाल सहजी केली आहे आणि पुढील अर्ध शतकी अंक प्रकाशनाच्या वाटचालीतील पहिला अंक सभासदांहाती देताना आम्हाला परम संतोष होतो आहे!

१५ व्या वर्षातला हा वर्षारंभ अंक आहे ५१ वा ! या निमित्ताने सिंहावलोकन करता लक्ष वेधून घेणारी आकडेवारी जशी नजरेत भरणारी आहे, तशीच काही वैशिष्ट्येही नजरेत भरणारी आहेत. 'अक्षर वाङ्मय'च्या कार्य-कर्तृवावर प्रकाश टाकणारी ही आकडेवारी आणि वैशिष्ट्ये पुढील कामाला प्रेरणा देणारी आहे.

**बोलकी आकडेवारी :**

* 'अक्षर वाङ्मय'चीपूर्ण वर्षे : १४ - अंक : ५०
* एकूण पृष्ठे : ७५००
* विशेषांक : ५
* आंतरराष्ट्रीय पातळीवरील विशेषांक : २

**लक्षणीय वैशिष्ट्ये :**

* आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यापक प्रमाणात पोहोचलेले एकमेव मराठी वाङ्मयीन नियतकालिक.

※ आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक संशोधक विद्वानांचे लेखन प्रकाशित करणारे एकमेव मराठी वाङ्मयीन नियतकालिक.

※ आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक विद्यापीठांच्या आणि अभ्यासकांच्या संग्रही असणारे एकमेव मराठी वाङ्मयीन नियतकालिक.

अशा 'अक्षर वाङ्मय'ला गेल्या १४ वर्षांत सभासदांनी नेहमीच आपले मानले आहे. सभासदसंख्या महिन्यागणिक, वर्षागणिक सातत्याने वाढती राहत आली असल्याने आम्हाला मराठीची सेवा करण्यास उत्साह वाटत आला आहे. वाचकांच्या या उदंड प्रतिसादामुळेच महाराष्ट्रातल्या, भारतातल्या आणि जगातील अभ्यासकांचे अभ्यासपूर्ण लेख, प्रतिभावंतांचेलेखन, अनेक देशांतील आणि संस्कृतीतील पुराणकथा व लोककथांचे मराठी अनुवाद आम्ही वाचकांना उपलब्ध करून देऊ शकलो आहोत.

अर्थपूर्ण मुखपृष्ठ आणि मुखपृष्ठाची अर्थपूर्णता उलगडून दाखवणारे 'मुखपृष्ठाविषयी.......' हे सदर 'अक्षर वाङ्मय'चे नेहमीच वैशिष्ट्य राहत आले आहे. सदर अंकातील मुखपृष्ठलेखतर सुवर्णमहोत्सवी आहे ! सदर अंकाच्या मुखपृष्ठाला सजवणारे छायाचित्र पाकव्याप्त काश्मीरमधील शारदापीठाचे आहे. ते भारतीय पुराणकथांबरोबरच इतिहास व पुराशास्त्र यांचे संदर्भ सूचित करणारे आहे. भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग असलेल्या शारदा-सरस्वती या देवतेसंदर्भात विचाराला चालना देणारे आहे. असे असल्याने या देवतेसंदर्भातील मुखपृष्ठलेख प्रदीर्घ स्वरूपाचाआहे.

मुखपृष्ठ लेखाबरोबरच काव्यसमीक्षा, संतवाङ्मय, शाहिरीवाङ्मय आणि परीक्षणे यांना स्थान देणारा 'अक्षर वाङ्मय'चा सदर अंक नेहमीप्रमाणे वाचकांच्या पसंतीस उतरेल अशी आशा आहे.

❏❏❏

# मुखपृष्ठ आणि मुखपृष्ठकथेच्या सुवर्णमहोत्सवी अंकाच्या निमित्ताने तयार केलेला तक्ता

– **डॉ. अरुण प्रभुणे**
सॅन होजे, कॅलिफोर्निया

| | |
|---|---|
| ✻ 'अक्षर वाङ्मय'चे एकूण प्रकाशित अंक : ५१ | ✻ डॉ. प्रभुणे : मुखपृष्ठकथांची पृष्ठसंख्या : ६६९ |
| ✻ 'अक्षर वाङ्मय'ची पूर्ण वर्षे : १४ | ✻ डॉ. प्रभुणे यांच्या मुखपृष्ठकथा : ५० |
| ✻ 'अक्षर वाङ्मय'चे चालू वर्ष : १५ | ✻ डॉ प्रभुणे यांची मुखपृष्ठ छायाचित्रे : ५० |

| **अंक क्र** | **अक्षर वाड्.मयचे प्रकाशनवर्ष** | **मुखपृष्ठकथेचे शीर्षक** | **मुखपृष्ठ कथेची पृष्ठे** |
|---|---|---|---|
| १ | २०१० जून-जुलै-ऑगस्ट | अजिंठ्यातील प्रसिद्ध चित्र | – |
| २ | २०१० सप्टें-ऑक्टो-नोव्हें. | कर्दळीचे पिवळे फूल व पक्षी | ०१ |
| ३ | २०११ डिसें-जाने-फेब्रु. | रथसप्तमी | ०२ |
| ४ | २०११ मार्च-एप्रिल-मे | अमेरिकन इंडियन्सची मकाकुमारी | १२ |
| ५ | २०११ जुलै-ऑगस्ट-सप्टें. | नागपंचमीची रांगोळी | ०५ |
| ६ | २०११ ऑक्टो-नोव्हें-डिसें. | कुंकुमरंगी अमेरिकन स्वीट गम वृक्ष | ०५ |
| ७ | **२०१२ जाने-फेब्रु-मार्च** | **वा. ल. कुलकर्णी विशेषांक** | **०२** |
| ८ | २०१२ एप्रिल-मे-जून | सॅन होजे शहराजवळील टेकडीवरील वृक्ष | ०२ |
| ९ | **२०१२ जुलै ते मार्च २०१३ (जोडअंक)** | **नाट्यविशेषांक (जोडअंक) प्रायोगिक नाटक : भारतीय आणि जागतिक** | ०१ |
| १० | २०१३ एप्रिल-मे-जून | व्हॅगेबाँड-रात्रीचे कल्पनाचित्र | ०३ |
| ११ | २०१३ जुलै-ऑगस्ट-सप्टें. | सॅन होजे शहराजवळील पाईनवृक्षबुंधा | ०८ |
| १२ | २०१३ ऑक्टो-नोव्हें-डिसें. | सप्तर्षी आणि ध्रुवमत्स्य | १९ |
| १३ | २०१४ जाने-फेब्रु-मार्च | 'काळीविंचूमाता' खरवडचित्र | ०८ |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | २०१४ एप्रिल-मे-जून | हवाई बेटावरील ज्वालामुखीचा उद्रेक | ०३ |
| १५ | २०१४ जुलै-ऑगस्ट-सप्टें. | दिव्यांची केलेली पूजा | ०४ |
| १६ | २०१४ ऑक्टो-नोव्हें-डिसें. | ऑरोरा-ध्रुवीय प्रकाश | १२ |
| १७ | २०१५ जाने-फेब्रु-मार्च | शुष्कपर्णवृक्ष, सॅन होजे | ११ |
| १८ | २०१५ एप्रिल-मे-जून | प्रिकली पेअर कॅक्टसवर उमललेले सुंदर फूल | ०४ |
| १९ | २०१५ जुलै-ऑगस्ट-सप्टें. | ऑस्ट्रेलियातील दाशटाईन केव्ह स्ट्रीट | ०३ |
| २० | २०१५ ऑक्टो-नोव्हें-डिसें. | भारताच्या गुजराथ राज्यातील कच्छचे रण | १५ |
| २१ | **२०१६ जाने ते सप्टें.** | **प्रा. सतीश बहादूर विशेषांक (चित्रपटभाषा विशेषांक-जोडअंक)** | **०१** |
| २२ | २०१६ ऑक्टो-नोव्हें-डिसें. | गौतम बुद्धांचा रक्षाअंश असलेला सुवर्णचंबू | १३ |
| २३ | **२०१७ जाने-फेब्रु-मार्च** | **किताबे नवरस विशेषांक** | **०६** |
| २४ | २०१७ एप्रिल-मे-जून | नितळाईवर सजणारे कर्दळपुष्प | ०३ |
| २५ | २०१७ जुलै-ऑगस्ट-सप्टें. | प्युब्लो अमेरिकन इंडियन्सची ‘मदर कचिना’ | १९ |
| २६ | २०१७ ऑक्टो-नोव्हें-डिसें. | येळावसला शेतात केलेली पूजा | १७ |
| २७ | २०१८ जाने-फेब्रु-मार्च | पाईन वृक्षाची बिलोरी रुपेरी चंदेरी सूचिपर्णी | २७ |
| २८ | २०१८ एप्रिल-मे-जून | दोनशे वर्षांचा चौसोपी वाडा | १४ |
| २९ | २०१८ जुलै-ऑगस्ट-सप्टें. | बॅरो येथील व्हेल बोन आर्च - आर्क्टिकचे प्रवेशद्वार | १७ |
| ३० | २०१८ ऑक्टो-नोव्हें-डिसें. | पाटण येथील श्रेष्ठ गणिती व कवी भास्कराचार्य दुसरे यांचा पुतळा | १६ |
| ३१ | २०१९ जाने-फेब्रु-मार्च | फ्रान्समधील १७,००० वर्षे प्राचीन लास्को गुहाचित्र | २७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | २०१९ एप्रिल-मे-जून | आदि बद्री येथील सरस्वती नदीचे उगमस्थान | १६ |
| ३३ | २०१९ जुलै-ऑगस्ट-सप्टें. | खेकड्यांकडून आपापत: निर्माण झालेली नाजुक, विलोभनीय वालुकानक्षीची नैसर्गिक कलाकुसर | २७ |
| ३४ | २०१९ ऑक्टो-नोव्हें-डिसें. | नामशेष होणाऱ्या आह्टना भाषेतील अस्वस्थ कवीमनाचा काव्याविष्कार | २१ |
| ३५ | २०२० जाने-फेब्रु-मार्च | पाणिनीय व्याकरणावर आधारित बौद्ध भिक्षू धर्मकीर्ती कृत 'रूपावतार' (१६६३) या व्याकरणग्रंथातील भूर्जपत्रावरील पान आणि रसायनशास्त्रातील मेंडलीव्हचा आवर्त सारणी - पीरियॉडिक टेबलचा स्कॉटलंड-मधील सेंट अँड्रयूज विद्यापीठातील शिकवण्याचा जगातील सर्वात प्राचीन तक्ता. | १४ |
| ३६ | २०२० एप्रिल-मे-जून | कच्छच्या रणातील सुमारे ४००० वर्षांपूर्वीच्या ढोलावीरा या हडप्पन शहरातील अवशेष | १६ |
| ३७ | २०२० जुलै-ऑगस्ट-सप्टें. | नील नभी पोपट पोपटी | २७ |
| ३८ | २०२० ऑक्टो-नोव्हें-डिसें. | अलास्कातील एक्झिट ग्लेशियर, हिमनदी | २७ |
| ३९ | २०२१ जाने-फेब्रु-मार्च | अमेरिकेतील युटा राज्यातील 'आर्चेस नॅशनल पार्क' मधील अखंड पाषाणातील नैसर्गिक 'टुरेट' पाषाणी कमान | १७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४० | २०२१ एप्रिल–मे–जून | मोराचे चित्र काढलेला हडप्पाकालीन अस्थिकुंभ | १६ |
| ४१ | २०२१ जुलै–ऑगस्ट–सप्टें. | ऑलिव्ह वृक्षाचा मनोहारी वृक्षपर्णसंभार | २८ |
| ४२ | २०२१ ऑक्टो–नोव्हें–डिसें. | उत्खननात सापडलेले जगातले सर्वात प्राचीन सुषिर वाद्य | २६ |
| ४३ | २०२२ जाने–फेब्रु–मार्च | खगोलस्थ कृत्तिका तारकासमूह | १८ |
| ४४ | २०२२ एप्रिल–मे–जून | रसरशीत, रसाळ, डाळिंबी रंगाचे डाळिंबातील दाणे | ३८ |
| ४५ | २०२२ जुलै–ऑगस्ट–सप्टें. | सागर गिळंकृत श्रीकृष्णाच्या द्वारकेचे सागरी पुरातत्त्वशास्त्राने संशोधिलेले अवशेष | २४ |
| ४६ | २०२२ ऑक्टो–नोव्हें–डिसें. | गोंडस जुळे सुरू वृक्ष. सदाहरित सुरूवृक्षशेंड्यावरी बैसला कृष्ण काक | ४३ |
| ४७ | २०२३ जाने–फेब्रु–मार्च | कृष्णरंगीस्तंभशिरी आसनस्थ दिमाखदार वीजपथदीपघट | २१ |
| ४८ | २०२३ एप्रिल–मे–जून | कृष्णकातळी कातीव कलाकृती हिममानवाची | ०८ |
| **४९** | **२०२३ जुलै ते मार्च २४** | **अंगाईगीते : भारतीय आणि जागतिक अक्षर वाड्.मय अंगाईगीत विशेषांक** | **०७** |
| ५० | २०२४ एप्रिल–मे–जून | मेपल वृक्षाची कमनीय वृक्षडहाळी | ०२ |
| ५१ | २०२४ जुलै–ऑगस्ट–सप्टें. | पाकव्याप्त काश्मीरमधील प्राचीन शारदापीठाचे भग्नावशेष | ३५ |
| | | | **अंक : ५१ (पृष्ठे : ६६९)** |

# मुखपृष्ठ आणि मुखपृष्ठकथेचा सुवर्णमहोत्सवी अंक!

**– डॉ. अरुण प्रभुणे**
सॅन होजे, कॅलिफोर्निया

डॉ. सूर्यवंशी : हॅलो सर, अभिनंदन !

डॉ. प्रभुणे : हॅलो, काय हो, कशाबद्दल अभिनंदन करताय?

– सर, आपल्या 'अक्षर वाङ्मय'साठी तुम्ही जे मुखपृष्ठ तयार केले ते ५१ वे आहे आणि या अंकात आपली ५० वी मुखपृष्ठकथा आहे!

– काय सांगता? ही ५० वी मुखपृष्ठकथा आहे? अरे वा! नानासाहेब, तुम्ही मोजून कळवताय की काय?

– हो सर. मोजूनच कळवतो आहे.

– वा! वा! ऐकून खूप आनंद झाला!

– सर, म्हणूनच म्हणतो की मुखपृष्ठ आणि मुखपृष्ठकथेचा हा सुवर्णमहोत्सवी अंक आहे!

आनंदाने मी फोन ठेवला आणि स्तंभित होऊन विचार करू लागलो, मागील अंकात ५० वी मुखपृष्ठकथा प्रकाशित झाल्यावर आम्हा दोघांच्याही ही गोष्ट कशी लक्षात आली नाही?

खरंच का आपण 'अक्षर वाङ्मय'च्या मुखपृष्ठाला सलग १५ वर्षांपर्यंत छायाचित्रांनी सजवीत आलो आहोत ? ५० अर्थपूर्ण व अभ्यासपूर्ण मुखपृष्ठकथांनी 'अक्षर वाङ्मय'ला समृद्ध करीत आलो आहोत? मुखपृष्ठकथा या अभ्यासपूर्ण लेख वाटाव्यातअसा हेतू मनात बाळगून ६६९ पृष्ठांचा भरगच्च एकटाकी मजकूर लिहीत आलो आहोत ! असेही वाटून गेले, की वाङ्मयीन नियतकालिकांत विनाखंड सलग एकटाकी लिहिलेल्या व प्रकाशित झालेल्या ५० मुखपृष्ठकथा कदाचित प्रथमच येत असाव्यात!

बौद्धिक ऊर्जा वर्धित करणाऱ्या अशा सुखद विचारांनी माझे मन श्रांत झाले आणि तृप्तीने नुसते भरून गेले! संतृप्त मन गतकालात रुंजी घालू लागले. 'अक्षर वाङ्मय'चे प्रारंभीचे दिवस आठवून त्यात रमू लागले...

**मन भूतकाळात रमू लागले :**

३० वर्षांपूर्वीचे नानासाहेब सूर्यवंशी माझे एम. ए. चे विद्यार्थी आणि २४ वर्षांपूर्वीचे माझे पीएच. डी. चे विद्यार्थी. २००० मध्ये त्यांनी पीएच. डी. पदवी प्राप्त केली. आता ते विद्यार्थी नसताना आणि मी अमेरिकेत दूरदेशी स्थायिक असतानाही गेले ३० वर्षे आमचे चांगले संबंध टिकून आहेत.

२००९ च्या ऑक्टोबर महिन्यात मला अमेरिकेतल्या स्टॅनफर्ड युनिव्हर्सिटीत रुजू व्हायचे असल्याने भारत सोडून अमेरिकेत निघण्याची घाई होती. अशा घाईत नानासाहेब एक दिवशी माझ्या उदगीरच्या घरी आले आणि म्हणाले, ''सर, एक आनंदाची बातमी आहे. एक वाङ्मयीन नियतकालिक काढायची मला दिल्लीहून परवानगी मिळाली आहे.'' मी मनापासून अभिनंदन केले. नंतर म्हणाले, ''सर, नियतकालिकाला नाव सुचवाना.'' नियतकालिकाला नाव नसताना परवानगी मिळाली म्हणून मला आश्चर्यच वाटले. मी नाव सुचवले, ''अक्षर वाङ्मय.'' हे नाव त्यांनाही आवडले आणि त्यांच्या नियतकालिकाचे आमच्या घरी असे बारसे झाले! मग थोड्या वेळाने म्हणाले, ''सर, आपले मार्गदर्शन हवे आहे.'' मी म्हणालो, ''अहो सूर्यवंशी, मी आता अमेरिकेत स्थायिक व्हायला निघालो आहे. तिथून मी काय मदत करू शकणार?'' ते ऐकेनात. शेवटी त्यांचा विश्वास आणि प्रेमळ आग्रह पाहिल्यावर मी मार्गदर्शन करायचे कबूल केले. आणि अमेरिकेत स्थायिक होण्यासाठी २००९ च्या ऑक्टोबरमध्ये आम्ही भारत सोडला.

आम्ही भारत सोडल्यावर १० महिन्यांनीजून-जुलै-ऑगस्ट २०१० मध्ये 'अक्षर वाङ्मय'चा पहिला अंक प्रकाशित झाला. मुखपृष्ठावर अजिंठा लेणीतील एक प्रसिद्ध चित्र छापलेले होते. असा पूर्ण तयार असलेला अंकच नानासाहेबांच्या हाती पडला होता. मुखपृष्ठासाठी चित्र निवडण्याची कटकट मिटली याचा आनंदही त्यांना झाला असणार.

दुसरा अंक अंक छापून तयार झाल्यावर नानासाहेबांना प्रेसचा फोन आला:

- सर, अंकाची छपाई झाली. मुखपृष्ठावर चित्र टाकायचे आहे. चित्र पाठवा.

- नानासाहेब म्हणाले, मागच्या अंकासारखे तुम्हीच टाकाना.
- नाही. ते आमचं काम नाही. तुम्ही चित्र पाठवाल ते आम्ही छापू.

अचानकच ही अडचण आली. आता ऐनवेळी काय करायचे?

नानासाहेबांनी अमेरिकेत फोन लावला. म्हणाले-

- सर, अशी अशी अडचण आली आहे. आता तुम्हालाच हे काम करावं लागतं सर.
- मला ? मला नाही जमणार हे. अहो, मी काही चित्रकार नाही.
- तसं नाही सर. तुम्हीच करू शकाल हे काम. माझं एवढं ऐका सर.

## नाइलाजानं आणि अनिच्छेनं अवघड कामाचा स्वीकार :

नाइलाजानं आणि अनिच्छेनं हे अवघड काम करायला मला मान्यता द्यावी लागली. चित्र काढायला तर येतच नव्हतं. म्हणून ते शक्यच नव्हतं. आता कसा मार्ग काढावा? विचारात पडलो. मग घरातले डिजिटल फोटो शोधले. शोधता शोधता उदगीरच्या घरातील अंगणात काढलेला एक सुंदर फोटो सापडला. मनात भरला.

आमच्या अंगणातल्या कर्दळीच्या फुलातील मध प्राशन करण्यासाठी रोज एक छोटा पक्षी येत असे. आम्हाला ते दृश्य पाहून खूप आनंद होत असे. फोटो काढावा वाटे. आपले चिमुकले पंख फडफडवीत फुलावर बसलेल्या त्या छोट्याशा पक्ष्याचा फोटो काढण्याचा अनेकदा प्रयत्नही केला पण फोटो काढणे जमू शकले नव्हते. किंचितही चाहूल लागली की चटकन् उडून पसार व्हायचा. पण एकदा अचानक जमले ! केलेच बंदिस्त त्याला कॅमेऱ्यात ! फोटो काढून खूप समाधान वाटले होते. तो फोटो संग्रही होता. मुखपृष्ठ सजवायला तो चांगला वाटला म्हणून दिला नानासाहेबांकडे पाठवून.

फोटो पाहून ज्ञानेश्वरीतली ओवी सहज आठवली होती -

का कमळावरि भ्रमर । पाय ठेविति हळुवार ।<br>
कुचुंबैल केसर । इया शंका ।।

या ओवीच्या वर लिहिले 'मुखपृष्ठाविषयी... ' आणि ओवीच्या खाली १०-११ ओळींचा मजकूर लिहिला.

'अक्षरवाङ्मय'मध्ये प्रकाशित झालेली ही पहिली छोटीशी मुखपृष्ठकथा.

त्या पहिल्या मुखपृष्ठकथेची ही पार्श्वभूमी आणि हा इतिहास. म्हणून मी लिहिलेली पहिली मुखपृष्ठकथा 'अक्षर वाङ्मय'च्या पहिल्या अंकात प्रसिद्ध झाली नव्हती. दुसऱ्या अंकात प्रकाशित झाली होती. २०१० सप्टेंबर-ऑक्टोबर-नोव्हेंबरचा तो अंक होता.

रसिक वाचकांना अंकाचे मुखपृष्ठ आवडले होते आणि त्या खालील मजकूरही. मग काय, नानासाहेबांची मोठी अडचण दूर झाल्याने ते निर्धास्त झाले आणि प्रत्येक अंकाच्या मुखपृष्ठासाठी कोणता फोटो शोधावा याची धास्ती माझ्या मागे लागली ती कायमची !

प्रत्येक अंकासाठी एक अर्थपूर्ण ठरेल असे छायाचित्र आणि छायाचित्राची अर्थपूर्णता जाणवेल अशी छोटी-मोठी मुखपृष्ठकथा लागणार होती. प्रत्येक वर्षी चार अंक म्हणजे वर्षाला चार छायाचित्रे लागणार आणि चार मुखपृष्ठकथा लिहाव्या लागणार होत्या ! हे जसे आनंदायी होते तसेच आव्हानात्मकही होते.

बरे, संग्रही असलेला किंवा स्वत: काढलेला फोटो असून भागणार नव्हते. तो फोटो माझ्या मनात असलेल्या मुखपृष्ठ संकल्पनेला साकार करणारा असला पाहिजे ही प्राथमिक अट होती. मनात कितीतरी संकल्पना होत्या त्या प्रमाणे फोटो शोधले गेले, नव्याने काढले गेले आणि 'अक्षर वाङ्मय'ची मुखपृष्ठे मनातल्या संकल्पनेप्रमाणे सजली गेली, चित्राला समोर ठेवून मुखपृष्ठकथा लिहिल्या गेल्या, त्या रसिक वाचकांच्या पसंतीस उतरत गेल्या. काळ पुढे पुढे सरकत गेला आणि त्याने सुवर्णमहोत्सवी मुखपृष्ठापर्यंत आणि मुखपृष्ठकथेपर्यंत कसे आणून पोहोचवले ते कळलेही नाही!

सुवर्णमहोत्सवी मुखपृष्ठाच्या निमित्ताने मुखपृष्ठांना सजवणारी छायाचित्रे आणि तत्संबंधित कथा यांचे जर विहंगमावलोकन केले तर त्यातील वैविध्य सहज नजरेत भरते.

**विहंगमावलोकन :**

मुखपृष्ठाला सजवणारी काही छायाचित्रे ही वेधक निसर्गदृश्ये आहेत. अशी छायाचित्रे कधी भव्यदिव्यत्वाने निसर्गापुढे नतमस्तक व्हायला लावतात. त्यांतून प्रतीतीला येणारी काव्यात्मता आणि सूचित होणारी जीवनार्थता मनाला भावणारी असते; तर अनेक छायाचित्रे रंगसंगतियुक्त असतात. सुरंगी दृश्यांतील रंगसंगतीची

मोहकता मनाला मोहवणारी अन् भुलवणारी असते. अशा मुखपृष्ठकथा मग ललितगद्यात्मक रूप घेऊन जन्माला आलेल्या आहेत.

काही मुखपृष्ठ कथांतून भारतीय आणि जगातील पातळीवरील पशु-पक्ष्यांच्या पुराणकथा आणि लोककथा आलेल्या असतात. या कथा अनेक संस्कृतीतील आहेत. या कथांतून त्या पशु-पक्ष्यांविषयीचे समज-गैरसमज, श्रद्धा-अंधश्रद्धा आणि त्यांच्या संदर्भांतील विज्ञानही प्रतिबिंबित झालेले आहे.

मुखपृष्ठावरील काही छायाचित्रे इतिहास आणि पुराशास्त्राकडे अंगुलिनिर्देश करणारी आहेत. अशा छायाचित्रांच्या मुखपृष्ठकथा अभ्यासावर आणि संशोधनावर आधारित असल्याने दीर्घ असतात. त्या संशोधनाला पूरक ठरणाऱ्या, नाही तर संशोधनविषय सुचवण्याची क्षमता असणाऱ्या आहेत. अशा मुखपृष्ठकथांचे स्वरूप मूलत: लेखांचे असते, म्हणूनच त्या संदर्भमूल्य असलेल्या आहेत.

मुखपृष्ठ सजवणारी काही छायाचित्रे लोकजीवन व लोकसाहित्याशी संबंधित असतात. तत्संबंधित मुखपृष्ठकथांतून परिचित-अपरिचित संस्कृतीतील रूढी, परंपरा, विधि मुखर होत असल्याचे आढळून येईल.

किती तरी मुखपृष्ठकथांतून जागतिक पातळीवरील पुराणकथा आणि लोककथांचे संदर्भ आलेले आहेत. त्यांचा तौलनिक विचारही केलेला आहे आणि प्रख्यात चित्रकारांनी रेखाटलेली छायाचित्रेही त्यांत औचित्यपूर्णरीत्या अंतर्भूत केली आहेत.

काही मुखपृष्ठावरील छायाचित्रे विज्ञान व खगोल-भूगोलविज्ञानसूचक असून त्याच वेळी ती संस्कृतिसूचकहीआहेत. अर्थातच तत्संबंधित मुखपृष्ठकथा संबंधित विज्ञानाचा परिचय करून देणाऱ्या तर आहेतच पण त्याच बरोबर सांस्कृतिक मूल्ये असणाऱ्या लोककथांना कवेत घेणाऱ्याहीआहेत.

अनेकानेक वैशिष्ट्यांनी युक्त असलेली मुखपृष्ठे आणि वैविध्यपूर्ण मुखपृष्ठकथांच्या निमित्ताने आंतरराष्ट्रीय लोककथांचे किती तरी अनुवाद मराठी सारस्वतात प्रथमच आले आहेत. असे अनुवाद प्रकाशित करता आल्याने मोठ्या आनंदाचा लाभ माझ्यापदरी पडू शकला आहे.

अमेरिकेत कायमचे वास्तव्याला असूनही अर्धशतकी मुखपृष्ठकथांचे लेखन करता आले आणि त्या द्वारा मराठी भाषेची व मराठी सारस्वताची सेवा करता आली याचे परम समाधान मला लाभू शकले आहे.

**गुरुदक्षिणा :**

नानासाहेबांचा फोन येऊन गेल्यावर माझ्या मनात विचार आला, की जर मी 'अक्षर वाङ्मय'ला अर्थपूर्ण मुखपृष्ठांनी सजवले असेल, तत्संबंधित सुरस मुखपृष्ठांनी आणि अभ्यासपूर्ण मुखपृष्ठ लेखांनी समृद्ध केले असेल तर 'अक्षर वाङ्मय'नेही माझे निवृत्त्योत्तर बौद्धिक जीवन समृद्ध केले आहे. अर्थपूर्ण बनवले आहे. सत्कारणी लावले आहे. हे सत्यही मला नाकारता येणार नाही. इंग्रजी मुलखात राहूनही मुखपृष्ठांवरील छायाचित्रांनी आणि मुखपृष्ठ लेखांनी महाराष्ट्रातील मराठी वाचक बांधवांची वाङ्मयसेवा करण्याची अपूर्व संधी मला प्राप्त करून दिली आहे हेही तितकेच खरे आहे !

मुखपृष्ठ आणि मुखपृष्ठकथेचा सुवर्णमहोत्सवी अंक प्रकाशित होत असताना असे म्हणावे वाटते की, नानासाहेब सूर्यवंशीसारखा वाङ्मयाची जाण असलेला, दर्जेदार मराठी वाङ्मयीन नियतकालिक प्रकाशित करण्याची सातत्याने धडपड करणारा विद्यार्थी मी घडवू शकलो आणि परदेशी वास्तव्यास असलेल्या स्थलांतरित गुरूला या ३० वर्षांपूर्वीच्या विद्यार्थ्याने गुरुदक्षिणा म्हणून मराठीची सेवा करण्याची संधी प्राप्त करून दिली ही बाब खरोखरीच मन:शांती देणारी आहे.

❑❑❑

**'अक्षर वाङ्मय' ची वर्गणी मनीऑर्डर / धनादेश /धनाकर्ष संपादक 'अक्षर वाङ्मय' या नावे किंवा मेल ट्रान्सफरने वर्गणी जमा करावयाची असल्यास भारतीय स्टेट बँक शाखा, अहमदपूर, जि. लातूर येथे जमा करावी.**

**खाते: संपादक 'अक्षर वाङ्मय' खाते क्र. ३६८३२८४६७५६**

**IFSC बँक क्र. SBIN - 0020041 या बँकेतील**

**अक्षर वाङ्मय खाते क्र. ३६८३२८४६७५६**

**वार्षिक वर्गणी रु. ५००/-**

**द्विवार्षिक वर्गणी रु. ९००/-**

**पंचवार्षिक वर्गणी रु. २०००/-**

**गुगल पे नं.- ९४२३६५५८४१**

## डॉ. सुरेश सावंत

यांनी लिहिलेला

बालकुमारांसाठी नवा कोरा कथासंग्रह

# अति तिथे माती




‘बालवयात नकळतपणे झालेल्या संस्कारांची शिदोरी त्यांना आयुष्यभर पुरते. लेखनातून नकळतपणे संस्कारांची पेरणी करणारं कसदार लेखन करण्याची कला डॉ. सावंत यांच्याजवळ आहे, याचा प्रत्यय ‘अति तिथे माती’ या बालकुमार कथासंग्रहातील कथा वाचताना येतो.’

**डॉ. मंदा खांडगे**

•

आर्ट पेपरवर संपूर्ण रंगीत छपाई

पृष्ठे : ६४

किंमत : रु. १८०

दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.®


www.diliprajprakashan.in

खरेदीसाठी संपर्क करा

७८७५८८७३११

०२० २४४८३९९५/०२० २४४७१७२३

RNI - No. MAHMAR 36829-2010 ISSN -2229-4929
Post Registration No.: Akshar Wangmay - RNP / OMD / 2022-2024




प्रत्येक भूप्रदेशाचे एक वेगळेपण असते. हे वेगळेपण तेथील भूगोल, निसर्ग, समाज, संस्कृती, लोकाचार, भाषा व्यवहार इ. मधून प्रतीत होत असते. साहित्याचा निर्माता या सर्वांचे प्रतिबिंब आपल्या साहित्यकृतीमधून रेखाटण्याचा प्रयत्न करीत असतो. वैदर्भी ग्रामीण कथात्म साहित्यातूनही याचा प्रत्यय येतो.

- डॉ. वासुदेव मुलाटे

**लेखक :** डॉ. सौ. वर्षा चिखले
भ्रमणध्वनी : ७९७२७०३३६३

**प्रकाशक :** स्वरूप प्रकाशन, छत्रपती संभाजी नगर
भ्रमणध्वनी : ९८२२६३४४३४

**प्रति,** ______________________

______________________

______________________

______________________

**Book-Post**

इंटरनेट आवृत्तीचे संकेतस्थळ
https://aksharwangmay.org

**प्रेषक,**
**डॉ. नानासाहेब सूर्यवंशी, 'प्रणव' रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर, जि. लातूर-४१३५१५**

**'अक्षर वाङ्मय' हे मासिक प्रकाशक रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी यांनी प्रतीक प्रकाशन, 'प्रणव' रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर, जि. लातूर-४१३५१५ येथे प्रकाशित केले.**